# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १३/ २०१२** **दिनांक २९.०७.२०१२**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा रविवार दि.२९.०७.२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-१८८७-२०१२, दिनांक २८ जुलै, २०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दि.२९.०७.२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **अ) दर्शन रांगेबाबत सादरीकरण. सादरकर्ता आर्किटेक्ट हफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई.**

**निर्णय क्र.६४५** (अ) आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांचे प्रतिनिधी आर्कि. किर्तीसागर बोल्लार हे आजचे सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी नियोजीत मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाबाबत खालिलप्रमाणे सादरीकरण केले.

अ) जुने प्रसादालय परिसरातील सर्व इमारती काढून त्याठिकाणी भव्य अशा दर्शन रांग संकूल इमारतीचे बांधकाम करणेत येईल. सदर इमारतीमधे काही तळघर भागात व त्यावर दोन मजले असतील त्यापैकी तळघरात संस्थानचे काही कार्यालये, कर्मचारी वाहन पार्किंग व मन्टेनन्स विंग करीता जागा असेल. वरील दोन मजल्यांवर प्रत्येकी आठ याप्रमाणे एकूण १६ दर्शन रांग हॉल असतील.

ब) मंदिर परिसरातील ऐतिहासीक महत्वाच्या इमारती वगळता इतर इमारती काढून विस्तीर्ण व सुशोभीत असा बगिचा करण्यात येईल. दर्शन रांग इमारती पासून समाधी मंदिर पर्यंत अंडरपास असेल. याशिवाय बुक स्टॉल, कापडकोठी, देणगी काऊंटर लाडू काऊंटर, कॅन्टीन इ. सुविधांसह कॅश काऊंटींग हॉल व प्रशासनाची काही कार्यालये यांचा समावेश असलेली एक इमारत मंदिर परिसरात प्रस्तावित करण्यात आली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन आर्किटेक्ट किर्तीसागर यांना खालीलप्रमाणे सूचना करणेत आल्या. .

०१. चप्पल व मोबाईल ठेवण्यासाठी येणाऱ्या व परत घेण्यासाठी येणाऱ्या साईभक्तांची गर्दी एकत्र (criss-crossing) होऊ नये यासाठी नियोजन करावे.
०२. मुख्य दर्शन रांग इमारतीला एकाहून अधिक प्रवेश मार्ग असावेत.
०३. नियोजीत दर्शन रांग इमारतीचे खालिल बाजूस संपूर्ण क्षेत्रात तळघराचे बांधकाम करण्यात यावे.
०४. प्रशासकीय कार्यालय करणेसाठी मुख्य दर्शन रांग इमारतीवर एक अतिरिक्त मजला वाढवावा.
०५. सुरक्षाविषयक उपाययोजनांसाठी प्लॅन अंतिम करण्याअगोदर Security Consultant चा सल्ला घेणेत यावा.
०६. गर्दीचे नियोजनाकरीता दर्शन रांग इमारत व समाधी मंदिर यांना जोडणाऱ्या दर्शन रांगेच्या अर्ध्या भागात Travellator बसविणेबाबत तांत्रिकदृष्टया तपासणी करावी

वरील सुचनांनुसार नकाशात सुधारणा करुन आर्कि. हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी सुधारित नकाशे सादर करावेत असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**ब) दर्शन रांगेबाबत सादरीकरण. आर्किटेक्ट श्री. पुष्कर कानविंदे, पुणे.**

**निर्णय क्र.६४५** (ब) आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे यांनी आजचे सभेपुढे मौजे रुई येथील संस्थान मालकीचे गट नं. २९३, मधिल ७ हे. ३२ आर जमिनीत शैक्षणिक व आध्यात्मिक विकास प्रकल्प उभारणेसाठी तयार केलेल्या नकाशांचे सादरीकरण केले. त्यावर मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पासाठीही त्यांनी संकल्पनात्मक नकाशे सादर करावेत अशी सूचना त्यांना सभेतर्फे करण्यात आली. यावर आर्किटेक्ट कानविंदे यांनी मंदिर परिसर पूनर्विकास प्रकल्पाकरीता नकाशे सादर करणेसाठी अवधी मिळावा अशी विनंती सभेपुढे केली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे यांनी मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पासाठी एका महिन्याचे कालावधीत नकाशे सादर करावेत असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**क) भक्तांसाठी पार्किंग व्यवस्था. सादरकर्ता श्री अविनाश डहाणुकर, मुंबई.**

**निर्णय क्र.६४५** **(क)** शिर्डी येथील सर्व्हे नं. १२५ (आरक्षण क्र. ३४) मधिल संस्थान मालकीचे जागेत करावयाचे नियोजीत बहुमजली वाहनतळ प्रकल्पासाठी आजचे सभेपुढे आर्किटेक्ट अविनाश डहाणुकर यांनी नकाशांचे सादरीकरण केले. त्याचा तपशिल खालिलप्रमाणे आहे. नियोजीत बहुमजली वाहनतळ इमारतीत बेसमेंट + तळमजला + ०६ मजले असणार आहेत.बहुमजली पार्किंग इमारत ही ग्रिन नॉर्म्सनुसार बनविण्याचे योजिले असून इमारतीची रचना पर्यावरण पूरक असणार आहे. सदर इमारतीत समाविष्ट ठळक बाबींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

A) बस व टेम्पो यासारख्या जड वाहनांची पार्किंग व्यवस्था बेसमेंट व तळ मजल्यावर करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| बेसमेंट | :- | ५० बसची क्षमता (टुरीस्ट बस करीता) |
| तळमजला | :- | ४० बसची क्षमता |
| एकूण | :- | ९० बसची पार्किंग क्षमता |

(उपरोक्त पार्कींग मध्ये बस व टेम्पो एकत्र पार्किग केल्यास १५० गाड्यांचे पार्किंग होऊ शकेल)

B) छोट्या वाहनाचें पार्किंग पहिल्या ते सहाव्या मजल्यावर करण्यात येईल त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ ला मजला | : | २९० वाहने |
| ०२ रा मजला | : | २९० वाहने |
| ०३ रा मजला | : | २९० वाहने |
| ०४ था | : | २९० वाहने |
| ०५ वा | : | २९० वाहने |
| ०६ वा | : | २९० वाहने |
| **एकूण पार्किंग** | **:** | **१७४० वाहने** |

जड व छोटी वाहने मिळून एकूण = १८३० वाहनांचे पार्किंग होईल.

C) Access :- वाहने प्रत्येक मजल्यावर चढविणे व उतरविणेकरीता दोन स्वतंत्र रॅम्प असतील. याशिवाय छोट्या वाहनांचे रॅम्पची (one way) ची रुंदी ४.५ मी. असेल तर प्रवासी वाहतुक बसेसची पार्किंगकडे जाण्यासाठी रॅम्पची रुंदी (two way) ९.० मीटर असेल.

D) जिने व लिफ्ट :- पार्किंग इमारतीचे प्रत्येक मजल्यावर माणसांना येणे जाणेकरीता जिने व लिफ्ट देण्यात आलेले आहेत. यात २.५ मी. रुंदीचे ३ जिने व २.० मी.x २.० मी. साईजच्या सहा लिफ्ट असतील.

E) शौचालय :- पार्किंग इमारतीचे प्रत्येक मजल्यावर महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र प्रत्येकी ४ टॉयलेट ब्लॉक, बाथरुम, मुताऱ्या व वॉश बेशीनची सोय करण्यात येईल.

F) सोलर :- सोलर पॅनलच्या सहाय्याने विजनिर्मिती करुन संपूर्ण पार्किंग इमारतीला विद्युत पुरवठा करणेत येईल.

G) साईभक्तांच्या सुविधेसाठी नियोजीत पार्किंग इमारतीमध्ये दुकानगाळे व उपहार गृह ठेवणेत येतील.

H) नियोजीत पार्किंग इमारतीत Recycle Plant, Green Building, Vertical landscaping, Solar Power booting system प्रस्तावीत केल्या आहेत.

I) नियोजीत पार्किंग इमारतीमध्ये नैसर्गिक पदध्दतीने क्रॉस व्हेंटीलेशन करण्यात येईल.

J) एकूण वाहन पार्किंग क्षमता = १८३० वाहने

K) इमारतीचे एकूण मजले = बेसमेंट + तळमजला + ६ मजले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता न देता, प्रस्ताव स्थगित ठेवणेत आला. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०२** **साईटेक संपूर्ण संगणकीकरणाचे प्रेझेंटेशन.**

**निर्णय क्र.६४६** यावर सविस्तर चर्चा होऊन, आजचे सभेत साईटेक प्रकल्पासाठी काम करत असलेले कॉग्निझंट कंपनीचे प्रकल्प अधिकारी श्री.संदिप भाले यांनी प्रकल्पासंदर्भात प्रात्यक्षित दाखविले व विचारण्यात आलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. त्यानुसार सर्व माहिती समजवून घेतल्यावर नवीन रिवाईजड प्लॅनला मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **राजीव गांधी जीवनदायी योजना -चर्चा**

**निर्णय क्र.६४७** **(१) मोफत केस पेपर्स्, ओपीडी तपासण्या इ. :-** योजनेचे नियम व MoU च्या तरतुदीनुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल या दोन्ही हॉस्पिटल्स्मध्ये पात्र लाभार्थी रुग्णांस कॅज्युल्टी, डॉक्टर्स्, कन्सलटंटस्, सुपर-कन्सलटंटस् यांचे केस पेपर्स् मोफत/विना शुल्क देण्यात येवुन, अशा लाभार्थी रुग्णांच्या आवश्यक त्या सर्व प्रकारच्या ओपीडी तपासण्या पुर्णपणे मोफत करण्यात येतील.

अशा सर्व तपासण्यांचे रिपोर्टस्/Films हॉस्पिटलमध्ये जमा रहातील, रुग्णांस देण्यात येवु नयेत, उदा.X-Ray, CT/MRI, २ D-Echo, TMT, Lab Tests etc.

*(तथापी मा.उप-वैद्यकीय/वैद्यकीय संचालक यांना त्यांचे अधिकार कक्षेत, अपवादात्कम परिस्थितीत, रूग्णाच्या पुढील उपचरांच्या दृष्टिने गरज असल्यास, अशा सर्व तपासण्यांचे रिपोर्टस्/ Films किंवा त्याच्या झेरॉक्स प्रती देता येतील).*

**(२) उच्च दर्जाचे इमप्लांन्टस् :-** उच्च दर्जाचे इमप्लांन्टस् उदा.ड्रग कोटेड स्टेंन्टस्, पेस-मेकर, डिव्हाइसेस्, व्हॉल्स, इ. वापरणे, सध्या एमडी इंडिया (TPA) कंपनीने प्रस्तावित व मंजूर केलेल्या दरांमध्ये शक्य नसल्याने व सदर बाब संस्थानला आर्थिक नुकसानकारक ठरु शकणार असल्याने, उच्च दर्जाच्या इमप्लांन्टस्साठी खालील प्रमाणे वाढीव दर मंजूर करण्यात आले.

| क्र. | प्रोसिजरचा प्रकार | इमप्लांन्ट | प्रस्तावित दर | वाढीव दर | एकुण मंजुर दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | Angioplasty | DE Stent-१ | ६०,०००/- | २०,०००/- | ८०,०००/- |
| २. | Angioplasty | DE Stent-२ | ८०,०००/- | ४०,०००/- | १,२०,०००/- |
| ३. | Angioplasty | DE Stent-३ | १,२०,०००/- | ३०,०००/- | १,५०,०००/- |

* 3rd Stent may be required in rare cases of Dissection in Coronary Artery/ Vessel.

**(३) प्रोसिजर्स्/सर्जरीज् :-** सध्या दोन्ही हॉस्पिटल्स्मध्ये उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांनुसार शक्य असतील त्याच प्रोसिजर्स / सर्जरीज करण्यात येतील.

योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या परंतु दोन्ही हॉस्पिटल्स्मध्ये सोयी सुविधा उपलब्ध नसल्यास, अशा रुग्णांस दाखल करुन न घेता, रुग्णांच्या सोयीनुसार, योजने अंतर्गत शासकीय/मान्यता प्राप्त इतर हॉस्पिटल्स्ना संदर्भीत करण्यात यावे.

श्री साईबाबा किंवा श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये सध्या नियमितपणे करण्यात येत असलेल्या, परंतु, योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या प्रोसिजर्स्/सर्जरीज् करण्यात येवु नयेत (अशा शस्त्रक्रिया करण्यात आल्यास, त्यास संबंधित डॉक्टर/कन्सल्टंट व हॉस्पिटल व्यवस्थापन जबाबदार राहील.)

**(४) आय.टी.नेटवर्क :-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल या दोन्ही हॉस्पिटल्स्च्या आय.टी.नेटवर्कसाठी आवश्यक असलेली किमान १० MBPS ब्रॉण्ड बँड लाईन, व्यवस्थापनाने स्वखर्चाने कार्यान्वित करुन घेणे.

इतर बाबी उदा.सपोर्टेड हार्डवेअर/सॉफ्टवेअर, स्कॅनर, कॅमेरा इ., एमडी इंडीया (TPA) कंपनीने इ.साठी संस्थानला वाजवी दर आकारणी करावी, संबंधित डॉक्टर्स्/स्टाफ यांना पुर्ण प्रशिक्षण (Training) देणे, तसेच, हार्डवेअर/सॉफ्टवेअरचे Comprehensive-Annual Maintenance Contract (AMC) वाजवी दरांमध्ये करुन देणे.

**(५) परतीचे भाडे :-** योजने अंतर्गत उपचारार्थ दाखल रुग्णांस संस्थान/हॉस्पिटल व्यवस्थापनाने परतीचे भाडे खालीलप्रमाणे रोखीने दयावे.

१. राहता तालुक्यातील रूग्णांस प्रत्येकी **रू.५०/-**

२. राहता तालुक्या बाहेरील, परंतु, अहमदनगर जिल्हयातील रूग्णांस प्रत्येकी **रू.१००/-**

३. अहमदनगर जिल्हया बाहेरील, परंतु, राज्यातील इतर जिल्हयांतील रूग्णांस प्रत्येकी **रू.१५०/-**

**(६) वैद्यकीय आर्थिक मदत :-** योजने अंतर्गत लाभार्थी रुग्णांस मा.मुख्यमंत्री मदत निधी, मा.पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी किंवा इतर शासकीय/निमशासकीय यांचेकडून वैद्यकीय आर्थिक मदत मिळविण्यासाठी अंदाजित खर्चाचे प्रमाणपत्र (Estimate of Expenses) देण्यात येवु नये, तथापी, ज्या रूग्णांची बिल रक्कम योजने अंतर्गत तरतुदी पेक्षा जास्त जास्त होवु शकेल, अशा रूग्णांस श्री साईबाबा संस्थान/हॉस्पिटल्स्ना अंदाजित खर्चाचे प्रमाणपत्र (Estimate of Expenses) देता येवु शकेल व श्री साईबाबा संस्थान/हॉस्पिटल्स्ना अशा रूग्णांसाठी इतर संस्था/देणगी दारांकडून मिळणारी आर्थिक मदत स्विकारता येईल.

**(७) बिले सादर करणे :-** योजने अंतर्गत दोन्ही मधील रूग्णांची बिले, बिलींग विभागाकडुन, एमडी इंडिया (TPA) कंपनीस On Line व्दारे One Line Billing पध्दतीने सादर करता येवु शकतील, म्हणजेच, मॅन्युअल कामाचा बोजा कमी करण्यासाठी, बिल रकमेचा ब्रेक-अप उदा.बेड/रूम चार्जेस्, औषधे/कन्झुमेबल्स्/डिस्पोजीबल्स् इ. च्या खरेदीची बिले/पावत्या, कन्सलटंटस्/डॉक्टर्स् चार्जेस्, नर्सिंग चार्जेस् इ. चा ब्रेक-अप देण्याची अवश्यकता रहाणार नसुन, एमडी इंडीया (TPA) कंपनीकडुन, बिलांच्या रकमेचा ब्रेक-अप देण्याची मागणी/सक्ती करण्यात येणार नाही.

**(८) नामंजुर बिले फेर सादर करणे :-** काही कारणांमुळे किंवा त्रुटींमुळे नामंजुर करण्यात आलेली बिले, त्रुटींची पुर्तता करुन, बिल रकमेच्या मागणीसाठी, एमडी इंडिया (TPA) कंपनीस फेर सादर करता येवु शकतील, अशा सर्व बिलांची रक्कम, एमडी इंडिया (TPA) कंपनीकडून मंजुर दर पत्रक/नियमानुसार हॉस्पिटल्स्ना अदा करण्यात येतील.

या बाबत एमडी इंडिया (TPA) कंपनीचे प्रतिनिधी, असि.जनरल मॅनेजर-ऑपरेशन्स्, डॉ.सचिन कासट यांनी, सर्व प्रोसिजर पुर्ण करण्यात येवुन बिले सादर केली जाणार असल्याने, बिले नामंजुर होवु शकणार नाहीत, किंबहुना, बिले नामंजुर होण्याचे प्रमाण शुन्य टक्के असले, असे स्पष्ट केले.

**(९) शिस्त भंग कमिटी/Empanelment Disciplinery Committee (EDC) :-** MoU अंतर्गत उद्‌भवणाऱ्या वाद/विवादांचे निराकरण करण्यासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या शिस्त भंग (EDC) कमिटीवर हॉस्पिटल प्रतिनिधी म्हणुन मुंबई येथील २ सेवा निवृत्त डॉक्टर्स्‌ची नेमणुक करण्यात आलेली असल्याचे एमडी इंडिया (TPA) कं. चे प्रतिनिधी, असि.जनरल मॅनेजर-ऑपरेशन्स्, डॉ.सचिन कासट यांनी स्पष्ट केले, सदर शिस्तभंग कमिटीचा निर्णय हॉस्पिटल्स्‌ना बंधनकारक राहिल.

याबाबत मा.उप-कार्यकारी अधिकारी, डॉ.माने सो., यांनी अशी सुचना केली की, ज्या हॉस्पिटलमध्ये जास्तीत जास्त केसेस करण्यात येतात/येतील, अशा हॉस्पिटलच्या प्रतिनिधीची EDC कमिटीवर नेमणुक करण्यात यावी, याबाबत, पुढील वर्षी अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येवुन, योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे एमडी इंडिया (TPA) व नॅशनल इन्सुरन्स कंपनीच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले.

**(१०) श्री साईनाथ हॉस्पिटल :-** योजनेची अंमलबजावणी श्री साईबाबा व श्री साईनाथ दोन्ही हॉस्पिटल्स्‌मध्ये करण्यात यावयाची असुन, दोन्ही हॉस्पिटल्स्‌साठी एक समान दर प्रणाली ठेवण्याबाबतच्या, मा.जिल्हाधिकारी सो., व मा.व्यवस्थापन समिती सदस्य डॉ.संजिवकुमार यांची सुचना, एमडी इंडिया (TPA) व नॅशनल इन्स्युरन्स कंपनीच्या प्रतिनिधींनी मान्य केली असून, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलसाठी एक समान दर पत्रकास मंजुरी देण्यात आलेली आहे.

**(११) संस्थान चॅरिटी/सवलतींचे दर :-** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलसाठी संस्थानचे चॅरिटी/सवलतींचे स्वतंत्र दर पत्रक रहाणार असुन, सदर चॅरिटी/सवलतींचे दर पत्रकास एमडी इंडिया (TPA) व नॅशनल इन्सुरन्स कंपनीचा कोणताही आक्षेप असणार नाही, असे सदर कंपन्यांच्या प्रतिनिधींनी मान्य केले असून, राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत लाभार्थी रुग्णांच्या व्यतिरिक्त इतर रुग्णांस संस्थान नियमानुसार दोन्ही हॉस्पिटल्स्‌मध्ये चॅरिटी/सवलतीचे दर आकारण्यात येतील.

**(१२) बिलांतील रकमेच्या फरक/सवलती बाबत :-** नवीन राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत काही विभागात करण्यात येणाऱ्या प्रोसिजर्स्/सर्जरीज्‌साठी, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या सध्याच्या दरांपेक्षा किंवा जुन्या जीवनदायी योजने अंतर्गत मंजुर दरांपेक्षा कमी दर देण्यात येणार असले, उदा.कॅथलॅब प्रोसिजर्स (ड्रग कोटेड स्टेंन्टस्, पेस मेकर्स्, डिव्हाईसेस इ.), किंवा महागडे व्हॉल्स् वापरुन करण्यात येणाऱ्या डबल व्हॉल्स् रिप्लेसमेंट हार्ट सर्जरीज् इ., किंवा सर्व प्रकारच्या ओपीडी तपासण्या पुर्णपणे मोफत करण्यात येणार असल्यामुळे, यापुढे संस्थानला दरवर्षी मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होणार असल्याची बाब, मा.व्यवस्थापन समिती सदस्यांचे, खालील आकडेवारीसह (विशेषत: कार्डीओलॉजी/कार्डीयाक सर्जरी विभाग) निदर्शनास आणुन देण्यात आली.

| S. N. | Procedure | Actual Exp. | RGJAY Pkg. | Diff. Amt.,/ Charity |
|---|---|---|---|---|
| 1. | Angioplasty - 1 Stent | 94,000/- | 80,000/- | 14,000/- |
| 2. | Angioplasty - 2 Stent | 1,39,000/- | 1,20,000/- | 19,000/- |
| 3. | If 3rd Stent is Required | 15,000/- | --- | 15,000/- |
| 4. | Balloon Mitral Volvotomy-BMV | 31,000/- | 20,000/- | 11,000/- |
| 5. | ASD Device Closure | 95,000/- | 80,000/- | 15,000/- |
| 6. | VSD Device Closure | 1,16,000/- | 80,000/- | 36,000/- |
| 7 | PDA Device Closure | 72,000/- | 60,000/- | 12,000/- |
| 8 | Pace Maker - VDDR | 1,15,000/- | 75,000/- | 40,000/- |
| 9 | Pace Maker - DDDR | 1,62,000/- | 75,000/- | 87,000/- |
| 10 | Bi-Ventricular Pacing or AICD | 3,42,000/- | 75,000/- | 2,67,000/- |
| 11 | DVR - Bi - Ventricular Valves | 1,86,000/- | 1,50,000/- | 36,000/- |

उपरोक्त प्रमाणे, प्रत्येक प्रोसिजरची तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कमीतकमी किंवा त्यापेक्षा जास्त रकमेची संस्थानला सवलत/चॅरिटी म्हणुन सोसावी लागणार आहे.

याबाबत, एमडी इंडिया (TPA) व नॅशनल इन्स्युरन्स कंपनीच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत सरसकट सर्वच प्रोसिजर्स्/सर्जरीज्‌चे दर कमी नसुन, काही दर कमी असले तरी, बऱ्याच प्रोसिजर्स्/सर्जरीज् दर, राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या दरांपेक्षा किंवा जुन्या जीवनदायी योजनेपेक्षा जास्त असल्याने, एक प्रकारे Counter Subsidy मिळणार असल्यामुळे संस्थान/हॉस्पिटल्स्‌ला आर्थिक तोटा होणार नाही, शिवाय, श्री साईनाथ हॉस्पिटलचे सध्याचे दर हे अत्यंत कमी, किंबहुना पुर्णत: मोफत असल्याने, परंतु, योजने

अंतर्गत, श्री साईनाथ हॉस्पिटलची बिले, श्री साईबाबा हॉस्पिटलला देण्यात येणाऱ्या दरांनुसार अदा करण्यात येणार असल्याने, संस्थानचे आर्थिक नुकसान होणार नाही, असे स्पष्ट केले.

मा.व्यवस्थापन समिती सदस्यांनी, एमडी इंडिया (TPA) व नॅशनल इन्स्युरन्स कंपनीच्या प्रतिनिधींचा सदर खुलासा मान्य केला असून, दोन्ही हॉस्पिटल्स्मध्ये एमडी इंडिया (TPA) च्या दरांनुसार योजना लागु करण्यात आल्यास आर्थिक नुकसान होणार नाही, किंवा जे काही आर्थिक नुकसान होईल, ते धर्मदाय संस्था/Charitable Institute म्हणुन सहन करावे लागेल, असे स्पष्ट करुन, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१३) विमा रकमेपेक्षा जादा खर्च :-** योजने अंतर्गत लाभार्थी रुग्णाची/कुटुंबाची विमा रक्कम रु.१,५०,०००/- पैकी काही विमा कालावधीत खर्च झालेली असेल, किंवा अल्प रक्कम बाकी असेल, अशा रुग्णांस त्यांचे खात्यावरील शिल्लक रकमेपेक्षा जादा खर्चाच्या प्रोसिजरची गरज असल्यास, योजने अंतर्गत मंजूर रकमेच्या मर्यादेपेक्षा जादा खर्चाची रक्कम अशा रुग्णांकडुन भरुन घेता येवु शकेल.

तथापी, अशा रुग्णांस दाखल होतानाच, तशी स्पष्ट लेखी कल्पना देण्याची जबाबदारी, **"आरोग्य मित्र"** एमडी इंडिया (TPA) यांची राहील.

**(१४) विविध शस्त्रक्रियांचे दर पत्रक :-** एमडी इंडिया (TPA) कंपनीकडुन राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत, कार्डीओलॉजी विभागातील, उपरोक्त क्र. २ मध्ये नमुद करण्यात आलेल्या काही प्रोसिजर्स्चे दर वाढवून देण्यात आले असुन, इतर, विभागातील प्रोसिजर्स्/शस्त्रक्रियांसाठी, एमडी इंडिया (TPA) कंपनीने प्रस्तावित केलेल्या दोन्ही हॉस्पिटल्स्च्या पॅकेजेस्च्या दर पत्रकास मान्यता देण्यात आली.

**(१५) कन्सल्टंटस् चार्जेस/शेअर :-** योजने अंतर्गत लाभार्थी रुग्णांच्या सर्व प्रकारच्या ओपीडी तपासण्या पुर्णपणे मोफत करण्यात येणार असल्या तरी, कन्सल्टंटस् चार्जेस्/शेअर पुर्वी प्रमाणेच देणे चालु राहिल किंवा संस्थान व्यवस्थापन त्याबाबत स्वतंत्रपणे बदल/Revision करु शकेल, एमडी इंडिया (TPA)/नॅशनल इन्स्युरन्स कंपनीचा त्यास आक्षेप राहणार नाही.

**(१६) रुग्णांच्या बिलांतील सवलती :-** रुग्णांच्या बिलांतील फरकाच्या रकमेपोटी सध्या प्रमाणे रुग्ण निहाय चॅरिटी/सवलत प्रस्ताव तयार करुन, त्यास जनसंपर्क अधिकारी, वैद्यकीय अधिक्षक/प्रशासक, वैद्यकीय संचालक, यांची मंजुरी घेण्याची आवश्यकता राहणार नसुन, लाभार्थी रुग्णांचे अॅडमिशन पासून डिसचार्ज पर्यंतचे सर्व कामकाज On line पध्दतीने होणार असल्याने, अशा रुग्णांकडून वाढीव बिलाच्या रकमेत सवलत देण्यासाठी विनंती अर्ज किंवा कागदपत्रांची मागणी करण्याची आवश्यकता राहणार नसुन, सदर बाब लेखा परिक्षणाच्या दृष्टीने सुध्दा ग्राहय धरण्यात यावी.

तथापी, सदर बाब आर्थिक महत्वाची असल्याने व दोन्ही हॉस्पिटल्स्मध्ये एमडी इंडिया (TPA) कं. कडुन रुग्णांच्या बिलांपोटी On line Payment बिलिंग/वित्त विभागाकडे जमा होणार असल्यामुळे, दरमहा दोन्ही हॉस्पिटल्स्चा रुग्ण/विभाग निहाय एकुण जमा/खर्चाचा अहवाल बिलिंग/वित्त विभागाकडुन मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेवून मंजुरीस्तव सादर करण्यात यावा.

मा.व्यवस्थापन समिती सभेने मंजुर केलेला जमा/खर्चाचा मासिक अहवाल लेखा परिक्षणाच्या दृष्टीने सुध्दा ग्राहय धरण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले.

तसेच, इतर रुग्णांच्या बिलांतील सवलतींबाबत, मा.व्यवस्थापन समितीच्या, दि.२४.७.२०११ रोजीच्या सभेतील विषय नं.२८, निर्णय क्र.५१९, अन्वये मंजुर करण्यात आलेली, **"श्री साईबाबा हॉस्पिटल मधील रुग्णांचे बिलांत देण्यात येणा-या सवलतींची नियमावली-२०११"** या पुर्वी प्रमाणेच अमलात/लागु राहील.

**(१७) मनुष्य बळ (Manpower) :-** योजनेच्या अंमलबजावणीसाठी एमडी इंडिया (TPA) कं. कडुन नेमणूक करण्यात येणाऱ्या **"आरोग्य मित्र"** कर्मचाऱ्यांच्या व्यतिरीक्त, मेडिकल को-ऑर्डिनेटर (MCO) व आवश्यकतेनुसार कर्मचारी/स्टाफ/अधिकारी/डॉक्टर्स/कन्सल्टंटस् यांची नेमणुक/बदली मा.उप/वैद्यकीय संचालक, यांच्या लेखी आदेशानुसार करता येवु शकेल.

तसेच, जुनी जीवनदायी योजना पुर्णपणे बंद होवुन, नवीन योजना सर्व जिल्हयांसाठी लागु झाल्यानंतर, सध्या जुन्या जीवनदायी योजने अंतर्गत बिलींगच्या कामकाजासाठी नेमणुक करण्यात आलेल्या कायम/कंत्राटी कर्मचाऱ्यांस, नवीन योजनेच्या कामकाजासाठी किंवा दोन्ही हॉस्पिटल्स्मधील इतर विभागांत मा.उप/वैद्यकीय संचालक, यांच्या लेखी आदेशानुसार नेमणुक/बदली करता येवु शकेल.

**(१८) On line Payment :-** एमडी इंडिया (TPA) कंपनीकडुन, रुग्णांच्या बिलांपोटी दोन्ही हॉस्पिटल्स्ला अदा करावयाची रक्कम On Line Payment पध्दतीने "The Executive Officer, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi" या नावाने संस्थान बँक खात्यामध्ये करण्यात येईल.

**(१९) दैनंदिन कामकाजाबाबतचे निर्णय:-** योजने अंतर्गत दोन्ही हॉस्पिटल्स्च्या दैनंदिन कामकाजाबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार, मा.उप-वैद्यकीय/वैद्यकीय संचालक यांना राहतील, परंतु कामकाजाचे नियोजन व आवश्यकतेनुसार, मा.उप-वैद्यकीय/वैद्यकीय संचालक यांना त्यांचे अधिकार कक्षेत, वैद्यकीय प्रशासक/अधिक्षक, जनसंपर्क अधिकारी/मॅनेजर यांचेकडे दोन्ही हॉस्पिटल्स्च्या दैनंदिन कामकाजाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करता येवु शकतील.

**(२०) मेडिकल कॅम्पस् :-** संस्थानच्या दोन्ही हॉस्पिटल्स्मधील रूग्ण दाखल होण्याचे प्रमाण फार मोठया प्रमाणात असल्याने, योजनेच्या प्रसिध्दीसाठी किंवा रूग्ण शोधण्यासाठी/ रूग्ण Identify करण्यासाठी नियमितपणे मेडिकल कॅम्पस् आयोजित करण्याचे/घेण्याचे दोन्ही हॉस्पिटल्स्ना बंधनकारक नसुन, मेडिकल कॅम्पस् घेण्याची व **मेडिकल कॅम्पस् कोऑर्डिनेटर्स्-MCCO** ची नेमणुक करण्याची अट वगळण्यात आली असुन, त्यास एमडी इंडिया (TPA) व नॅशनल इन्स्युरन्स कंपनीच्या प्रतिनिधींनी सहमती मान्यता दर्शविली असुन, त्यास मान्यता देण्यात आली आहे.

**(२१)** मा. त्रिसदस्यीय व्यवस्थापन समिती सभेने मंजुर केलेल्या उपरोक्त महत्वाच्या बाबीं MoU/करारामध्ये समाविष्ट करण्यात येतील, त्यास एमडी इंडिया (TPA)/नॅशनल इन्स्युरन्स कंपनीची मान्यता राहील.

**(२२)** मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना, ही शासकीय आरोग्य योजना असुन, सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने MoU मधील इतर सर्व बाबी उदा.योजनेचे नियम, अटी, दैनंदिन कामकाज, On Line Payment इ. महत्वाच्या सर्व बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात येवुन, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल या दोन्ही हॉस्पिटल्स्साठी प्रत्येकी रु.३००/- च्या स्टँप पेपरवर MoU /करार करुन, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची दोन्ही हॉस्पिटल्स्मध्ये अंमलबजावणी चालु करण्यास मान्यता देण्यात आली.

**(२३) On line Payment :-** एमडी इंडिया (TPA) कंपनीकडुन, रुग्णांच्या बिलांपोटी दोन्ही हॉस्पिटल्स्ला अदा करावयाची रक्कम On Line Payment पध्दतीने "The Executive Officer, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi" या नावाने संस्थान बँक खात्यामध्ये करण्यात येईल.

**(२४) दैनंदिन कामकाजाबाबतचे निर्णय:-** योजने अंतर्गत दोन्ही हॉस्पिटल्स्च्या दैनंदिन कामकाजाबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार, मा.उप-वैद्यकीय/वैद्यकीय संचालक यांना राहतील, परंतु कामकाजाचे नियोजन व आवश्यकतेनुसार, मा.उप-वैद्यकीय/वैद्यकीय संचालक यांना त्यांचे अधिकार कक्षेत, वैद्यकीय प्रशासक/अधिक्षक, जनसंपर्क अधिकारी/मॅनेजर यांचेकडे दोन्ही हॉस्पिटल्स्च्या दैनंदिन कामकाजाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा.उप-वैद्यकीय/वैद्यकीय संचालक यांना रहातील.

**(२५) लाभार्थी रूग्णांसाठी औषधे, साधन सामुग्री खरेदी करणे :-** सध्या हॉस्पिटलच्या औषध भांडार/मेडीकल स्टोअरमध्ये ऐन वेळी, उपलब्ध नसलेली, परंतु रूग्णांसाठी अत्यावश्यक असलेली, औषधे, साधन सामुग्री इ. नातेवाईकांना बाहेरून/मार्केटमधुन त्यांनी स्वतः खरेदी करण्यासाठी लिहुन दिली जातात.

परंतु, राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत लाभार्थी रूग्णांस, योजनेचे नियम, अटी व मार्गदर्शक तत्वांनुसार कोणतीही औषधे, साधन सामुग्री इ. बाहेरून/मार्केटमधुन त्यांनी स्वतः खरेदी करण्यासाठी लिहुन देता येणार नसुन, अशी औषधे, साधन सामुग्री इ.सर्व हॉस्पिटलमधुनच पुरविणे बंधनकारक असल्याने, हॉस्पिटलच्या औषध भांडार/मेडीकल स्टोअरमध्ये ऐन वेळी, उपलब्ध नसलेली, परंतु रूग्णांसाठी अत्यावश्यक असलेली, औषधे, साधन सामुग्री इ. बाहेरून/मार्केटमधुन मा.उप/वैद्यकीय संचालकांची परवानगी/मंजुरीने, औषध भांडार/मेडीकल स्टोअर विभागास अशी खरेदी करून दयावी लागणार आहेत, अशा प्रकारे औषधे, साधन सामुग्री इ.च्या बिलांची रक्कम वित्त विभागा मार्फत चेक/डिडीव्दारे नंतर संबंधितांस अदा करण्यात येतील.

तथापी, या बाबत संबंधित डॉक्टर्स्, कन्सलटंटस्नी शक्यतो, हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेली औषधे, साधन सामुग्री इ. वापरावी, अपवादात्मक परिस्थितीतच औषधे, साधन सामुग्री इ. बाहेरून/मार्केटमधुन खरेदी करण्याची मागणी करावी.

*(या बाबत व्यवस्थापन/उप/वैद्यकीय संचालक यांच्याकडुन सर्व संबंधित डॉक्टर्स्, कन्सलटंटस्ना वेळोवेळी लेखी सुचना देण्यात याव्यात, सदर सुचनांचे पालन न करणाऱ्या किंवा हेतुपुरस्र, जाणुनबुजुन उल्लंघन करणाऱ्या संबंधित डॉक्टर्स्, कन्सलटंटस् यांचेवर योग्य ती शिस्त भंगाची/ Disciplinery कारवाई करण्यात यावी).*

**(२६) मेडिकल कॅम्पस् :-** संस्थानच्या दोन्ही हॉस्पिटल्स्मधील रूग्ण दाखल होण्याचे प्रमाण फार मोठया प्रमाणात असल्याने, योजनेच्या प्रसिध्दीसाठी किंवा रूग्ण शोधण्यासाठी/ रूग्ण Identify करण्यासाठी नियमितपणे मेडिकल कॅम्पस् आयोजित करण्याचे/घेण्याचे दोन्ही हॉस्पिटल्स्ना बंधनकारक नसुन, मेडिकल कॅम्पस् घेण्याची व **मेडिकल कॅम्पस् कोऑर्डिनेटर्स्-MCCO** ची नेमणुक करण्याची

अट वगळण्यात आली असुन, त्यास एमडी इंडिया (TPA) व नॅशनल इन्स्युरन्स कंपनीच्या प्रतिनिधींनी सहमती मान्यता दर्शविली असुन, त्यास मान्यता देण्यात आली आहे.

**(२७)** उपरोक्त बाबीं व्यतिरिक्त MoU/करार पत्रातील इतर नियम व अटींमध्ये (Terms & Conditions) कोणताही बदल करण्यात आलेला नसुन, इतर नियम व अटीं जसेच्या तसे लागु रहातील.

**(२८)** मा. त्रिसदस्यीय व्यवस्थापन समिती सभेने मंजुर केलेल्या उपरोक्त महत्वाच्या बाबीं MoU/ करारामध्ये समाविष्ट करण्यात येतील, त्यास एमडी इंडिया (TPA)/ नॅशनल इन्स्युरन्स कंपनीची मान्यता राहील.

**(२९)** मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना, ही शासकीय आरोग्य योजना असुन, सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने MoU मधील इतर सर्व बाबी उदा.योजनेचे नियम, अटी, दैनंदिन कामकाज, On Line Payment इ. महत्वाच्या सर्व बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात येवुन, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल या दोन्ही हॉस्पिटल्स्‌साठी प्रत्येकी रु.३००/- च्या स्टँप पेपरवर MoU/करार करुन, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची दोन्ही हॉस्पिटल्स्‌मध्ये अंमलबजावणी चालु करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०४** **ट्रॅफिक वॉर्डन कर्मचाऱ्यांबाबत.**

**निर्णय क्र.६४८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **सुरक्षा व्यवस्थेबाबत.**

**निर्णय क्र.६४९** यावर सविस्तर चर्चा होऊन, आजचे सभेत ईगल आय एन्टरप्रायजेस, कॅम्प शिर्डी, मॉडर्न व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स (इं) प्रा.लि., कॅम्प शिर्डी, सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., कॅम्प शिर्डी, रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस अॅण्ड सिस्टम प्रा.लि., कॅम्प शिर्डी, जी.के. सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., कॅम्प शिर्डी या पाच सिक्युरिटी एजन्सीचे मालकांना समक्ष बोलाविण्यात येऊन, त्यांना सुरक्षेबाबत खालील सुचना केल्या.

१. त्याचेकडे असलेल्या सर्व कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या पात्रता पाहण्यासाठी लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेऊन तसेच फिजीकली फिटनेस प्रमाणे त्यांना नियुक्त करावे.

२. कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांना सुरक्षिततेबाबत असलेले सर्व प्रकारचे प्रशिक्षण देण्यात यावे.

३. दर्शनासाठी येणाऱ्या सर्व साईभक्तांशी सौजन्याने व नम्रतेने वागावे. तसेच त्यांना योग्य मार्गदर्शन करावे.

४. सर्व कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे मेडिकल चेकअप करावे. इ. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **साईआश्रम १ व २ हाऊसकिपींग टेंडरधारक प्रेझेंटेशन व वाटाघाटीबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१४.०७.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.४७९ अन्वये निविदाधारकांकडून प्राप्त झालेला लिफाफा नं. ०२ (प्राईज बीड) उघडण्यात आले होते. उपस्थीत निविदाधारकांना एकत्रित सभागृहात बोलावून त्यांचेशी सविस्तर चर्चा करण्यात आली. साईआश्रम -०१ व ०२ हाऊसकिपींगचे काम मोठ्या स्वरुपाचे असल्याने त्यावर सविस्तर अभ्यास करावा लागणार आहे. तसेच निविदधारकांना त्यांचे हाऊसकिपींग कामासंबधीचे (Presentation) करावे लागेल. यासाठी निविदाधारकांना पूढील मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे आमंत्रित करुन सर्वांना १०-१० मिनिटांची वेळ देऊन त्यांनी Presentation करावे, त्यावेळी चर्चा/वाटाघाटी करण्यात येईल व त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. त्यामुळे त्याच दिवशी सर्व निविदाधारकांचे उघडलेले प्राइस बीड पुन्हा सिलबंद करण्यात आले होते.

उपरोक्त निर्णयानुसार साईआश्रम ०१ चे ७ व साईआश्रम-०२ चे ९ निविदाधारकांना हाऊसकिपींग कामाबाबतचे सादरीकरण (Presentation) करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये आमंत्रीत करुन सिलबंद केलेले प्राइस बीड लिफाफा उघडणे व त्यावर त्यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आजचे सभेत साईआश्रम- १ साठीचे ७ व साईआश्रम-२ साठीचे ९, उपस्थित निविदाधारकांना हाऊसकिंपीग कामाबाबतचे सादीकरण (Presentation) करण्याची संधी देण्यात आली.**

**आजच्या सभेत चर्चा वाटाघाटीमध्ये, निविदाधारकांनी त्यांच्या मुळ निविदेत नमुद केलेले मनुष्यबळ, यंत्रसामग्री व सर्व करासह मागणी केलेल्या रक्कमेमध्ये ते काही कमी-जास्त करणार आहेत किंवा कसे? याबाबत निविधारकांना विचारणा करण्यात आली. त्यानुसार निविदाधारकांनी त्यांचे सुधारित दर सभेपुढे काहीनी तोंडी तर काहीनी लेखी स्वरुपात सादर केले. त्याबाबत तशा नोंदी घेण्यात आल्या.**

**वेळ जास्त झाल्यामुळे चर्चा वाटाघाटीनुसार, प्रत्येक निविदाधारकांना** OFFICE OF THE COMPTROLLER AND AUDITOR GENERAL OF INDIA - NEW DELHI, Tender No.418/GS/5- 2011 Dated 06 September, 2011 **या कॅग रिपोर्टप्रमाणे सादर केलेल्या कागदपत्रासाठी (टेक्निकल बीडवर) ७० टक्के मार्कस् व चर्चा वाटाघाटीमध्ये दिलेल्या दरावर (प्राइस बीडवर) ३० टक्के मार्कस् देण्यात येऊन, Successful Bider (SB- 1, 2...) बाबतचे अंतिम तक्ते तयार करुन पुढील सभेपुढे सादर करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.०७ सिक्युरिटी कन्सलटंट वाटाघाटीबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग १ व २ त्याचप्रमाणे श्री साईप्रसादालय साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती व इतर संस्थान संलग्न इमारतीमध्ये तसेच संस्थानचे महत्वाचे परिसरात सुरक्षिततेचे दृष्टीकोनातून सि.सि.टी.व्ही. कॅमेरे व इतर अनुषंगीक सुरक्षा साहित्य खरेदी करुन कार्यान्वित करणेकामी तांत्रिक सुरक्षा सल्लागार नियुक्त करणे आवश्यक असलेने दि.१९.११.२०११ चे मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय क्र.८४२ अन्वये सुरक्षा कन्सल्टंटशी नेमणूक करणेकामी निविदा मागविणेत याव्यात असे ठरले. त्यानुसार सुरक्षा कन्सल्टंट नेमणेकामी दि.१७.०४.२०१२ रोजी नाशिक, पुणे, मुंबई या ठिकाणाहून प्रसिध्द होणाऱ्या महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा स्विकारणेची अंतीम मुदत दि.३०.०४.२०१२ अखेर ठेवण्यात आली होती. सदर मुदतीअंती खालीलप्रमाणे ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. महेंद्रा स्पेशल सर्व्हिस ग्रुप, पुणे
२. इंडियन इंडस्ट्रिअल सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., दिल्ली
३. डिगनिटी आय.टी. कन्सल्टंटस्, पुणे
४. मे. डॉल्फीन, अहमदनगर

दि.१७.०४.२०१२ चे सभेमध्ये उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ४ निविदा उघडणेत येऊन, निविदासादरकर्त्यांना सभेपुढे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता निविदासादरकर्त्यांनी एकत्रित दर दिलेले नसलेने त्यांचे एकत्रित सुधारित दर घेऊन पुढील सभेपुढे सादर करणेत यावेत असे ठरले होते.

**निर्णय क्र.६५१ यावर सविस्तर चर्चा होऊन, आजचे सभेत निविदाधारकांनी भरलेल्या सर्व करांसहित (लॉजिंग-बोर्डींग इ.) चे प्राप्त झालेले ०४ दरपत्रके उघडणेत येऊन त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन तो पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१ जीवनदायी योजने अंतर्गत प्राप्त रकमेतील आढळुन आलेल्या तफावती बाबत.**

**प्रस्ताव-** जीवनदायी योजने अंतर्गत शस्त्रक्रियांच्या बिलांपोटी मा.उप-संचालक, आरोग्य विभाग, नाशिक, यांचेकडुन रू.२,८९,८४,३१२/- इतकी रक्कम डिमांड ड्राफ्ट क्र.४४५२३०, दि.७.७.२०१२ व रूग्णांची यादी यादी दि.१३.७.२०१२ रोजी प्राप्त झालेली आहे.

सदर डिमांड ड्राफ्ट सोबतची रूग्णांची यादी तपासली असता, यादीतील काही रूग्णांची नावे या पुर्वीच प्राप्त झालेल्या अनुदान यादीतही समाविष्ट असल्याचे निदर्शनास आले असुन, त्याबाबत मा.उप-संचालक, आरोग्य विभाग, नाशिक यांच्या कार्यालयास टेलीफोन वरून व मा.कार्यकारी अधिकारी साो. यांच्या स्वाक्षरीनीशी पत्राव्दारे कळविण्यात आले असुन, तफावतीची रक्कम, अनुदान रक्कम बाकी असलेल्या दुसऱ्या रूग्णांच्या नावे समायोजित करून घेण्याबाबत कळविण्यात आले आहे, सोबत प्रत जोडलेली आहे.

उपरोक्त विषयी, आरोग्य संचालनालय, मुंबई, यांचेकडे कोणीतरी तक्रार दाखल केलेली असल्यामुळे, सदर तक्रारीची तातडीने दखल घेण्यात येवुन, आरोग्य संचालनालय, मुंबई यांचेकडुन मा.उप-संचालक, कार्यालय, नाशिक यांचेकडे तपास व चौकशी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक दि.२७.७.२०१२ रोजी पाठविण्यात आले असल्यामुळे, हॉस्पिटल प्रतिनिधीसही पाचारण करण्यात आले होते.

त्यानंतर, मा.उप-संचालक, कार्यालय, नाशिक यांचेकडुन संदर्भ क्र.३ चे पत्र प्राप्त झाले असुन, मा.उप-संचालक, आरोग्य विभाग, नाशिक यांच्या कार्यालयाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी, लेखा अधिक्षक व संबंधित कर्मचारी यांनी सदरकामी, दि.२८.७.२०१२ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलला समक्ष भेट देवुन, मा.वैद्यकीय संचालक साो., तसेच मा.उप-कार्यकारी अधिकारी साो., व मा.कार्यकारी अधिकारी साो. यांचीही भेट घेवुन, संदर्भ क्र.१ च्या डिमांड ड्राफ्ट व्दारे अदा करण्यात आलेल्या

रू.२,८९,८४,३१२/- रकमेपैकी १५० रूग्णांची रू.१,५६,३४,७७५/- इतकी रक्कम यापुर्वीच अदा करण्यात आलेली असल्यामुळे, मा.उप-संचालक, आरोग्य विभाग, नाशिक यांच्या नावे धनादेशाव्दारे लवकरात लवकर परत करण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

सदर अधिकाऱ्यांस, मा.उप-कार्यकारी अधिकारी सो. व मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी जादा प्राप्त झालेली रक्कम, अद्याप अनुदान रक्कम बाकी असलेल्या दुसऱ्या रूग्णांच्या नावे समायोजित करून घेण्याबाबत सुचविले असुन, संस्थानकडुन रक्कम परत करण्याबाबतची प्रक्रिया समजावुन देवुन, सदर रक्कम मा.व्य.स.सभेच्या मंजुरी शिवाय परत करता येणार नाही, त्यामुळे जादा रक्कम दुसऱ्या रूग्णांच्या नावे समायोजित करणे अधिक योग्य होईल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

तथापी, सदर अधिकाऱ्यांनी तफावतीची रक्कम व रूग्णांची संख्या फार मोठी असल्याने, तसेच चौकशी समिती सदस्य व मा.सह-संचालक, कोषागार (ट्रेझरी), नाशिक यांच्या सुचनेनुसार अति अदा रक्कम, परत मिळवुन घेणे नियमानुसार योग्य असुन, इतकी मोठी रक्कम समायोजित करणे संबंधित अधिकाऱ्यांच्या अधिकार कक्षेत बसत नसल्यामुळे, रक्कम परत करण्यात यावी, अशी पुन्हा-पुन्हा विनंती केली आहे.

तरी, १५० रूग्णांची रू.१,५६,३४,७७५/- इतकी तफावतीची रक्कम मा.उप-संचालक, आरोग्य विभाग, नाशिक, यांच्या नावे धनादेशाव्दारे परत करण्यात यावी किंवा कसे, याबाबत योग्य तो निर्णय होणेस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६५२** **यावर सविस्तर चर्चा होवुन, मा.उप-संचालक, आरोग्य विभाग, नाशिक यांनी त्यांचेकडील जा.क्र.:उपसंआसे/लेखा-५ब/जीआयो/३२७७९/२०१२ दि.२७.७.२०१२ रोजीचे पत्रान्वये, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये जीवनदायी योजने अंतर्गत हृदय शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या रूग्णांच्या बिलांपोटी मागणी करण्यात आलेली १५० रूग्णांची दुसऱ्यांदा प्राप्त झालेली (दुबार अदायगी झालेली) रू.१,५६,३४,७७५/- मात्र रक्कम दुसऱ्यांदा प्राप्त झालेली आहे का? याची पडताळणी करुन दुसऱ्यांदा प्राप्त झालेली असल्यास वित्त/लेखा विभागामार्फत, मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक, यांच्या नावे धनादेशाव्दारे परत करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **श्रीमती संगीता प्रभाकर वाबळे, सहा.शिक्षिका यांना प्राथमिक विभागाकडे पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनश्रेणीत परावर्तीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती संगीता प्रभाकर वाबळे यांनी दि.१२.०४.२०१२ रोजीचे अर्जान्वये महाराष्ट्र शासन निर्णय दि. ११/११/२०११ नुसार पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनश्रेणीत परवर्तीत करुन प्राथमिक विभागाकडे सेवा करण्याची संधी मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. त्यांचे शिक्षण बी.ए.बी.एड. (स्पे. इंग्रजी ) झालेले असून त्या सध्या के.जी. विभागाकडे कार्यरत आहेत.

श्रीमती संगीता प्रभाकर वाबळे यांची जा. नं. एसएसएस-वशी १ /११०८३/ १९९८ दि. १२ नोव्हेंबर १९९८ अन्वये श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी विभागाकडे पुर्व प्राथमिक विभागामध्ये "सहाय्यक शिक्षक " या पदावर नेमणूक करण्यात आलेली असून दि.१३.११.१९९८ रोजी त्या कामावर हजर झालेल्या आहेत.

उपरोक्त संदर्भ २ च्या शासन निर्णयान्वये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राथमिक शाळांना जोडलेल्या इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गांना शिक्षक मंजूरीच्या निकषानुसार जेथे ४ किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षक पदे मान्य होतात तेथे देय पदांपैकी २५% पदे पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनश्रेणीमध्ये परावर्तीत करण्याची प्रक्रीया उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
यापुर्वी अशी सवलत देवून पद भरलेले नाही. सध्या ५ वी ते ७ वी चे एकूण ६ वर्ग तुकडया असून शाळा संहिता १.३ शिक्षक या नियमानुसार एकूण ०८ शिक्षक आवश्यक आहेत पैकी सध्या ६ सहा. शिक्षक पदे भरलेली असून ०२ पदासाठी जाहिरात दिलेली आहे. शिक्षक भरती आरक्षण (रोस्टर) नुसार बिगर मागास (Open) नुसार सध्या ०२ पदे रिक्त आहेत. शासनाच्या निर्णयानुसार देय पदांपैंकी २५% म्हणजे एकूण २ पदे अशा वेतनश्रेणीत परावर्तीत करता येतात. श्रीमती वाबळे या बिगर मागास या गटातून आहेत व शालेय रोस्टरनुसार नियमात बसत आहे. आजमितीस शाळेच्या आस्थापनेवर असा एकच उमेदवार उपलब्ध आहे.

श्रीमती वाबळे या आपल्या कामाशी अत्यंत प्रामाणीक असून त्यांचे काम समाधानकारक आहे. तसेच त्यांचे गोपनीय अहवालात त्यांना A ग्रेड मिळालेला आहे. सध्या त्या पुर्व प्राथमिक विभागाकडे (के.जी. विभाग) कार्यरत आहेत. त्यांची वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० असा आहे. श्रीमती वाबळे यांचे शिक्षण B.A. B.Ed झालेले आहे. त्यांचे शिक्षण व १२ वर्ष सेवेचा कालावधी पाहता त्यांना प्राथमिक विभागाकडे प्राथमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणी मध्ये परावर्तीत करण्यात यावे असे

वाटते. तसेही प्राथमिक विभाकडील प्रत्येक वर्षाची नैसर्गिक तुकडी संख्येची वाढ लक्षात घेता व त्या मुळात संस्थानचे आस्थापनेवर कार्यरत असल्याने शालेय दृष्टीकोनातून विचार करता इ. ५ वी ते ७ वी विभागाकडील एक शिक्षकाची जागा कायम स्वरुपी भरुन निघेल. त्यांना इतर प्राथमिक शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी ५२००-२०२०० अशीच राहील फक्त त्यांचा ग्रेड पे २८०० इतका दयावा लागेल. श्रीमती वाबळे यांना पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनश्रेणीमध्ये परावर्तीत करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे. तरी पुढील निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.६५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील शिक्षक रिक्त पदे लेखी परिक्षा व मुलाखतीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात प्राथमिक व माध्यमिक विभागासाठी आवश्यक सहा. शिक्षकांची (परिविक्षाधीन) नेमणूक करणेकामी उपरोक्त संदर्भ ३ व ६ अन्वये जाहिरात देण्यात आली होती. सुधारीत जाहिरातीनुसार ५५% पेक्षा जास्त गुण असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागणी करण्यात आली होती. अर्ज पोहचण्याची अंतीम तारीख दि. २०.०६.२०१२ अखेर होती. तसेच याबाबत नियमानुसार सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र अ. नगर यांनाही कळविण्यात आले होते. उपलब्ध पदे व उमेदवारांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| ०१ | **सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) प्राथमिक** (इ.१ ली ते ७ वी) | ०७ | एचएससी (विज्ञान ) , डी.एड / डी.टी.एड (इंग्रजी माध्यम) OBC-01, VJ/NT-01, ST -01, Open - 04 |
| ०२ | **सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) माध्यमिक** (इ. ८ वी ते १० वी) | ०१ | बी.ए. बी.एड . (इंग्रजी, स्पे.) आरक्षण - SC/ST/VJ/NT - 01 |

| **अ. नं.** | **तपशिल** | **प्राथमिक** | **माध्यमिक** |
|---|---|---|---|
| ०१ | जाहिरातीनुसार थेट आलेले अर्ज | १७८ | ९२ |
| ०२ | सेवायोजना कार्यालयाकडून आलेले नांवे | ७६ | २१ |
| ०३ | एकूण | २५४ | ११३ |
| ०४ | अपात्र उमेदवार | १७४ | ८९ |
| ०५ | **जाहिरातीनुसार पात्र उमेदवार** | **८०** | **२४** |

उपरोक्तप्रमाणे पात्र ठरलेल्या उमेदवारां पैकी दि. ०४.०७.२०१२ रोजीचे मंजूर टिपणीने भरावयाच्या रिक्त पदानुसार १ पदासाठी ५ उमेदवार यास अनुसरुन प्राथमिक विभागाकडील ७ जागांसाठी एकूण ३२ उमेदवार व माध्यमिक विभागाकरीता १ पदासाठी ३ प्रवर्गातून ७ उमेदवार अशा एकूण ३९ उमेदवारांना दि.१५.०७.२०१२ रोजी दुपारी १२.३० ते ०२.०० यावेळेत श्री साईबाबा इंग्लिश मेडीयम स्कूलमध्ये लेखी परीक्षेसाठी निमंत्रीत करण्यात आले होते.

**प्राथमिक विभाग** **एकूण पदे - ०७**

| प्रवर्ग | पदे | लेखी परीक्षा कॉल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ओबीसी | ०१ | ०५ | ०१ |
| व्ही.जे. / एन.टी. | ०१ | ०५ | ०४ |
| एस. टी. | ०१ | ०२ | ०१ |
| खुला | ०४ | २० | ०७ |
| **एकूण** | **०७** | **३२** | **१३** |

**माध्यमिक विभाग** **एकूण पदे - ०१**

| प्रवर्ग | पदे | लेखी परीक्षा कॉल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| एस. सी. | ०१ | ०३ | ०० |
| एस. टी. | | ०२ | ०२ |
| व्ही.जे./ एन.टी. | | ०२ | ०२ |
| **एकूण** | **०१** | **०७** | **०४** |

दि. १५.०७.२०१२ रोजी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेसाठी प्राथमिक विभागाच्या ७ जागांसाठी १३ व माध्यमिक विभागाच्या १ जागेसाठी ४ असे एकूण १७ उमेदवार हजर होते. या सर्व उमेदवारांचे मूळ कागदपत्रांची प्रत्यक्ष तपासणी करुन त्यांची उपस्थितीबाबत स्वाक्षरी घेवून दुपारी १२.१५ मि. त्यांना परीक्षा हॉलमध्ये सोडण्यात आले. दुपारी १२.३० वाजता लेखी परीक्षेस सुरुवात

झाली. दुपारी ०२.०० वाजता लेखी परीक्षा संपली. त्यानंतर श्री साईबाबा इंग्लिश मेडीयम स्कूलचे कार्यालयामध्ये मा. विशेष कार्य. अधिकारी, कनिष्ठ महाविद्यालय व इंग्लिश मिडीयम स्कूल प्राचार्य, आस्थापना विभाग प्रतिनिधी यांचे समक्ष कनिष्ठ महाविद्यालयाचे सहा. शिक्षकांकडून उत्तर पत्रीका तपासणी करण्यात आल्या व निकालपत्रक तयार करुन सीलबंद करण्यात आले आहे. यावेळी संपूर्ण प्रक्रियेचे चित्रीकरण करण्यात आलेले आहे.

तसेच दि.१६.१२.२०१२ रोजीचे मंजूर टिपणीनुसार लेखी परीक्षेसाठी हजर असलेल्या प्राथमिक विभागाच्या १३ व माध्यमिक विभागाच्या ०४ असे एकूण १७ उमेदवारांना मुलाखत पत्र देवून दि. २५.०७.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता श्री साईनिवास अतिथीगृह येथे निमंत्रत करण्यात आले. मुलाखतीचे वेळी प्राथमिक विभागाच्या ७ जागांसाठी १२ व माध्यमिक विभागाच्या १ जागेसाठी ४ असे एकूण १६ उमेदवार हजर होते. या सर्व उमेदवारांचे मूळ कागदपत्रांची प्रत्यक्ष तपासणी करुन दुपारी १२.०० वाजता मुलाखतीस सुरुवात झाली. याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**प्राथमिक विभाग** **एकूण पदे - ०७**

| प्रवर्ग | पदे | मुलाखत कॉल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ओबीसी | ०१ | ०१ | गैरहजर |
| व्ही.जे. / एन.टी. | ०१ | ०४ | ०४ |
| एस. टी. | ०१ | ०१ | ०१ |
| खुला | ०४ | ०७ | ०७ |
| **एकूण** | **०७** | **१३** | **१२** |

**माध्यमिक विभाग** **एकूण पदे - ०१**

| प्रवर्ग | पदे | मुलाखत कॉल | उपस्थिती |
|---|---|---|---|
| एस. सी. | ०१ | ०० | ०० |
| एस. टी. | | ०२ | ०२ |
| व्ही.जे./ एन.टी. | | ०२ | ०२ |
| **एकूण** | **०१** | **०४** | **०४** |

यावेळी मा. श्री. विजय आव्हाड (प्राचार्य ), संजिवनी ॲकडमी (CBSC) स्कुल, कोपरगांव यांना इंग्रजी विषयाचे व मा.श्री. पी.आर कुंदे (माजी प्राध्यापक) एस.एस.जी.एम.कॉलेज ,कोपरगांव, यांना विज्ञान विषयाचे तज्ञ म्हणून निमंत्रीत करण्यात आले होते. यावेळी श्री. आर.एस.साबळे, विशेष कार्य अधिकारी (शैक्षणिक संकुल), सौ. झेड. व्ही. इनामदार, प्राचार्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल शिर्डी, श्री विकास शिवगजे, प्र. प्राचार्या कनिष्ठ महाविद्यालय यांचे उपस्थितीत उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या, यावेळी संपूर्ण प्रक्रियेचे चित्रीकरण करण्यात आलेले असून तज्ञांनी व उपस्थित संस्थान अधिकाऱ्यांनी घेतलेल्या मुलाखतीनुसार पात्र उमेदवारांची यादी पाकीटात सिलबंद करण्यात आलेली आहे.

प्राथमिक विभागाकडील १ पद इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गासाठी राखीव आहे. सदर पदासाठी १ उमेदवार लेखी परीक्षेस हजर होते, परंतु मुलाखतीला ते गैरहजर राहिले. त्यामुळे इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गाचे पदावर पात्र उमेदवार नाही. सबब सदरचे पदावर बिगर मागास प्रवर्गातुन (Open) निवड केलेल्या क्रमवारीतील उमेदवारांची २०१२-१३ या शैक्षणिक वर्षासाठी तात्पुरती नेमणूक करावी लागेल. पुढील निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तज्ञांनी व उपस्थित संस्थान अधिकाऱ्यांनी घेतलेल्या मुलाखतीनुसार पात्र उमेदवारांची सिलबंद पाकीटातील यादी उघडण्यात येऊन प्रत्यक्ष मुलाखतीमध्ये खालीलप्रमाणे उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे. त्याची नोंद घेण्यात आली.**

**प्राथमिक विभाग-**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | गुणानुक्रम |
|---|---|---|---|
| **०१** | **कु. भांगरे रेश्मा दशरथ, मु.पो. मावेशी, ता.अकोला, जि.अहमदनगर** | **S.T.** | **---** |
| **०२** | **श्रीमती कुमावत कविता राजु, मु.पो.ता. राहाता, जि.अहमदनगर** | **V.J./N.T.** | **---** |
| **०३** | **कु.खरमाळे शुभांगी सुदाम, मु.पो.भडगाव, ता.पारनेर, जि.अहमदनगर** | **खुला** | **१** |
| **०४** | **कु.आभाळे सोनाली मच्छिंद्र, मु.पो.एकरुखे, ता.राहाता, जि.अहमदनगर** | **खुला** | **२** |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | कु.गोर्डे स्नेहल शिवनाथ, मु.पो.ता. शेवगाव, जि.अहमदनगर | खुला | ३ |
| ०६ | कु.म्हस्के गितांजली भिमराज, मु.पो. टाकळीकाजी, ता.जि. अहमदनगर | खुला | ४ |
| ०७ | श्री.देशमुख प्रतापराव निराजीराव, मु.पो.ता. पाथर्डी, जि.अहमदनगर | खुला | प्रतिक्षा यादीवर |

**माध्यमिक विभाग-**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | गुणानुक्रम |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती मोरे शितल मनोहर, मु.पो. घुलेवाडी, ता.संगमनेर, जि.अहमदनगर | S.T. | --- |
| ०२ | श्री.लहामगे संजय तुकाराम, मु.पो. आडगाव, पिंप्री-निर्मळ, ता. राहाता, जि.अहदमनगर | N.T. | प्रतिक्षा यादीवर |

**वरीलप्रमाणे निवड केलेल्या उमेदवारांना नियमानुसार नेमणूका देणेत याव्या व प्राथमिक विभागासाठी ओ.बी.सी. प्रवर्गातील राखीव जागेसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने बिगरमागासवर्गातील गुणानुक्रमानुसार क्र.४ चे उमेदवार कु.म्हस्के गितांजली भिमराज, यांना शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी तात्पुरती नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४. विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.६५५** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** श्री साईबाबा संस्थानच्या व्दारावती किंवा अन्य निवासस्थानांमध्ये जे साईभक्त निवास करुन जातील अशा भक्तांकडून निवासस्थानाच्या बाबतीतील त्रुटी एसएमएस फिडबॅक व्दारे घेण्यात याव्यात, जेणेकरुन निवासस्थानाच्या त्रुटीची माहिती घेऊन त्यामध्ये दुरुस्त्या करता येतील. S.M.S. पाठविणाऱ्या भक्तांनाकडुन S.M.S. व्दारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना फक्त Yes/ No पर्याय निवडावा लागेल, अशी सोय उपल्बध करुन दयावी.

(कार्यवाही- अधिक्षक, द्वारावती, साईआश्रम-०१ व ०२/ आय.टी. विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र. ६४५ ते ६५५ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर रात्रौ ०८.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|---|
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी